पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८ लेखा विभाग
क्र.लेखा /१३/कावि/१५८५/२०१७
दिनांक :१८/०७/२०१७

परिपत्रक

**विषय:- वैद्यकिय अग्रीम समायोजनाबाबत....**

**संदर्भ :-**१) लेखा विभागाकडील परिपत्रक क्र.लेखा/१३/कावि/१८७० /२०१५ दि. २५/८/२०१५
२) मा. आयुक्त यांचे कडील परिपत्रक क्र. वैघ/७/कावि/१४२/२०१६ दि . २८/१/२०१६
३) मा. आयुक्त यांचे कडील परिपत्रक क्र.वैद्य/१३/कावि/२६२/२०१६ दि. २९/२/२०१६
४) क्र.लेखा/१३/कावि/१७२७/२०१६ दि. २२/११/२०१६

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ हे दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून मनपा अधिकारी/ कर्मचा-यांना लागू करणेत आलेले आहे. त्यानुसार मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिनांक २९/२/२०१६ पर्यन्त त्यापुर्वी घेतलेल्या अगाऊ रक्कमांची बिले मंजूरी कामी वैद्यकीय विभागाकडे पाठविणेबाबत कळविलेले होते. त्यानंतर बिले स्विकारणेत येणार नाही. असेही कळविणेत आलेले होते. तथापि लेखा विभागाकडील वैद्यकिय अग्रीम रजिस्टरची तपासणी करणेत आली असता अधिकारी/कर्मचारी यांनी वैद्यकिय अग्रीम रक्कम घेतलेली आहे, तथापि, ब-याच प्रकरणी अद्यापही आगाऊ रकमेचे समायोजन केलेले नसलेचे निदर्शनास आले आहे. ३१ मार्च २०१४ पर्यंतची यादी यापूर्वीच संबंधित विभागाकडे पाठविणेत आलेली होती. सन २०१४-२०१५ व दि. १/४/२०१५ ते दि ३१/८/२०१५ पर्यन्तची प्रलंबित वैद्यकीय अग्रीमची यादी संदर्भ क्र. ४ अन्वये संबंधित विभागास पाठविलेली आहे. त्यानुसार अधिकारी / कर्मचारी यांचे वैद्यकिय अग्रीमाचे समायोजन करणेकामी १५ दिवसाची मुदत देणेत आली होती. व तसे केल्याचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते. तथापि वारंवार स्मरण/ पाठपुरावा करुन देखील सदरची बाब शाखाप्रमुखांनी गांभीर्याने घेतल्याचे दिसून येत नाही . कारण अद्यापही समायोजनाची कार्यवाही केलेली नाही. व परिस्थिती पुर्ववत असलेचे दिसुन येते. अनेक आगाऊ रक्कमांचे अद्यापही समायोजन झालेले नाही. ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षणात-ही याबाबत आक्षेप उपस्थित झालेले असून समायोजन झाले नसलेने आक्षेपाची पुर्तता करता येऊ शकत नाही .

सबब, ज्या कर्मचाऱ्यांनी अग्रीमापोटी वैद्यकीय बिले अद्यापही सादर केलेली नाहीत अशा कामगारांचे / सेवकांचे दरमहाचे पगारबीलातून वैद्यकीय अग्रीमाची वसुली नजीकचे महिन्यापासुन चालू करावी. जेणेकरुन अशी जुनी प्रकरणे निकाली काढता येतील. व तसा अहवाल १५ दिवसाचे आत सादर करावा. अन्यथा सदरची बाब मा. आयुक्त सो यांचे निदर्शनास आणुन देणेत येईल याची नोंद घ्यावी.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

प्रति,
सर्व विभागप्रमुख
------------------------ विभाग